# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 13 May 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांत, आज उत्साहात मतदान होत आहे. यात मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह ११ मतदारसंघाचा समावेश आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान चालणार आहे.

****

राज्यात ११ मतदारसंघात सकाळी ११ वाजेपर्यंत एकूण १७ पूर्णांक ५१ टक्के मतदान झालं. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात १९ पूर्णांक ५३ टक्के, जालना २१ पूर्णांक ३५, बीड १६ पूर्णांक ६२, नंदुरबार २२ पूर्णांक १२, जळगाव १६ पूर्णांक ८९, रावेर १९ पूर्णांक शून्य तीन, मावळ १४ पूर्णांक ८७, पुणे १६ पूर्णांक १६, शिरूर १४ पूर्णांक ५१, अहमदनगर १४ पूर्णांक ७४ टक्के, तर शिर्डी लोकसभा मतदारसंघात सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पूर्णांक ९१ टक्के मतदान झालं.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे, महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे, एमआयएमचे उमेदवार सय्यद इम्तियाज जलिल, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मतदान केलं.

जालना मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे, शिर्डी मतदारसंघात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील, तर नंदुरबार तालुक्यातल्या नटावद इथं राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजय कुमार गावित यांनी मतदान केलं.

****

जालना लोकसभा मतदारसंघात मतदारांचा उत्साह दिसून येत असून, अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. जालना

शहरातल्या गोल्डन ज्यूबली शाळेत आदर्श मतदान केंद्रावर दिव्यांगासाठी व्हीलचेअर आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं सुरमाबाई थोरात या १०७ वर्षाच्या आजींनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मतदानाचा हक्क बजावला. बीड लोकसभा मतदारसंघातल्या मतदान केंद्र क्रमांक ३५० च्या दोनशे मीटरच्या परिघात बचत गटांमार्फत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत.

****

बीड मतदारसंघातल्या कोरडेवाडी इथल्या ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. साठवण तलावाच्या मागणीसाठी हा बहिष्कार टाकला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. यावर लवकरच तोडगा काढला जाईल, अशी माहिती, उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली.
दरम्यान, बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं एका वृत्तवाहिनीचे पत्रकार वैभव कनगुटकर यांचं आज सकाळी निधन झालं, तर ४८ वर्षांचे होते. आज सकाळी मतदान सुरू झाल्यानंतर मतदानाचं वार्तांकन करत असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागलं आणि त्यातच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने अधिक उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात येत्या २० मे रोजी मतदान होणार असून, यामध्ये राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्वच मतदारसंघांमध्ये प्रचारानं आता वेग घेतला आहे.
भाजपचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज धुळे इथं महायुतीचे उमरेदवार सुभाष भामरे यांच्या प्राचारार्थ सभा होत आहेत. त्यानंतर ते पालघर जिल्ह्यात वसई इथं देखील प्रचारसभा घेणार आहेत.

****

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांची देखील काल धुळ्यात इंडिया आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा झाली.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नाशिक इथं शिक्षण संस्था तसंच बांधकाम व्यावसायिक, व्यापारी संघटना अशा विविध संस्थांच्या बैठका घेऊन संवाद साधला.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबई उत्तर - मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उज्ज्वल निकम यांच्यासाठी तर उत्तर -पूर्व मुंबईत मिहिर कोटेचा यांच्या प्रचारसभांना संबोधित केलं.
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल दक्षिण-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातील उमेदवार अनिल देसाई यांच्या प्रचारासाठी ट्रॉम्बे इथल्या चिताकॅम्प इथं सभा घेतली.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ - सीबीएसई नं इयत्ता बारावीच्या परिक्षेचा निकाल आज जाहीर केला. या परिक्षेत एकूण ८७ पूर्णांक ९८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचं मंडळानं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. जवळपास २४ हजार विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गूण मिळवले आहेत. सविस्तर निकाल सीबीएसईच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

****

लातूर इथले मराठवाडा मुक्तिसंग्रामातले ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, पत्रकार जीवनधर शहरकर यांचं आज लातूर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ९६ वर्षांचे होते. राजस्थान शिक्षण संस्थेत ते मराठी आणि हिंदी विषयाचे ते शिक्षक होते. शहरकर यांचं आज लातूर इथं देहदान करण्यात येणार आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग - आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स संघादरम्यान सामना होणार आहे. अहमदाबाद इथं संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****